**प्रेसनोट** **दि.०१/०६/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**पैशाचे हरवलेले पाकीट पोलीसांच्या कर्तव्यदक्षतेने मिळाले परत**

दि.३१/०५/२०१९ रोजी पोलीस नाईक बोबडे व पोलीस नाईक शैलेश सोनवणे यांना मुंढवा मार्शल कर्तव्य असताना ते मुंढवा गाव या ठिकाणी पेट्रोलिंग करीत असताना त्यांना इसम नामे विशाल लोणकर रा. केशवनगर, मुंढवा, पुणे यांनी एक पैसे व महत्वाचे डॉक्युमेन्ट असलेले पाकीट मुंढवा चौक या ठिकाणी सापडले असले बाबत सांगून ते पाकीट सदर कर्मचायांच्या ताब्यात दिले. सदर कर्मचारी यांनी ते पाकीट पोलीस ठाणे येथे महिला पोलीस हवालदार भारती होले यांच्या ताब्यात देवून पाकीट मालकाचा शोध घेणेबाबत कळविल्याने, महिला पोलीस हवालदार भारती होले यांनी सदर पाकीटामधील आधारकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स व पॅनकार्ड याची पडताळणी करता ते अमित सुरेश पुडके, रा. केशवनगर, मुंढवा, पुणे यांचे असल्याचे समजून आल्याने व अमित सुरेश पुडके यांनी त्यापुर्वी प्रॉपर्टी मिसिंग दाखल केल्याचे समजून आल्याने मपोहवा. होले यांनी सदर प्रॉपर्टी मिसिंग वरील मोबाईल क्र. प्राप्त करुन व त्याव्दोर अमित पुडके यांना संपर्क करुन व त्यांना पोलीस ठाणे येथे बोलावून त्यांचे हरविलेले पाकीट परत केल्याने त्यांनी त्यामधील पैसे, ए.टी.एम. व इतर किंमती दस्तऐवज सुखरुप असल्याची खात्री करुन पोलीसांचे आभार मानले.

तरी सदर पोलीस कर्मचायांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**दि.०१/०६/२०१९**

**(संपतराव डी. भोसले)**
**वरीष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**